माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- 2089 दिनांक :- 9६/८/22

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.०२/०८/२०२२

१. अपिलकर्ता श्री. लहू शिवाजी कांबळे
राहणार :- वैदुवाडी, संगम सोसायटी,जुनी म्हाडा कॉलनी
सुरक्षा नगर रोड, हडपसर पुणे

२. जन माहिती अधिकारी तथा,
प्र.उप अभियंता
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका.

श्री. लहू शिवाजी कांबळे
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा प्र. उप अभियंता, पुणे महानगरपालिका.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री.लहू कांबळे यांनी दिनांक ११/०७/२०२२ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्र.उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे मे.प्रियांक एंटरप्रायजेस या कंपनी मार्फत पुरविलेल्या कंत्राटी कामगारांची माहिती मिळणेकामी अर्ज केला होता.

सदर अर्जात विचारले प्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकूण २१३९५ पृष्ठे रक्कम रु.४२७९०/- कार्यालयाच्या कोषागारात भरलेनंतर माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जा.क्र.१८४९ दि.२१/७/२०२२ ने कळविलेचे जनमाहिती अधिकारी तथा प्र.उप अभियंता यांनी सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ११/०७/२०२२ | १०/०८/२०२२ | २१/०७/२०२२ | निरंक | निरंक |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री.कांबळे यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे– ‘‘माहिती मिळाली नाही.’’

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २०/०८/२०२२ | २९/०८/२०२२ | नाही. | – | ०७/०९/२०२२ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :– दि. १५/०९/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :– अनुपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :– उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | मे.प्रियांक एंटरप्रायजेस या कंपनी मार्फत पुरविलेल्या कंत्राटी कामगारांची माहिती मिळणेकामी अर्ज केला होता. | कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकूण २१३९५ पृष्ठे रक्कम रु.४२७९०/- कार्यालयाच्या कोषागारात भरलेनंतर माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जा.क्र.१८४९ दि.२१/७/२०२२ ने कळविलेचे जनमाहिती अधिकारी तथा प्र. उप अभियंता यांनी सांगितले. |

## विवेचन

कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकूण २१३९५ पृष्ठे रक्कम रु.४२७९०/- कार्यालयाच्या कोषागारात भरलेनंतर माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जा.क्र.१८४९ दि.२१/७/२०२२ ने कळविलेचे जनमाहिती अधिकारी तथा प्र. उप अभियंता यांनी सांगितले. तसेच दि.२२/०७/२०२२ रोजी चलनाबाबत अर्जदारास फोनद्वारे कळविले असता चलन रक्कम मोठी असलेने अभिलेख तपासणी करणेकामी सोमवारी येणार असलेचे अर्जदाराने सांगितले. अपील दाखल केलेनंतर अपील सुनावणीच्या तारखेच्या दरम्यानचे काळात अर्जदाराने अभिलेख तपासणी करून "आमचे समाधान झालेले आहे. तसेच आपणाकडील अर्ज रद्द करून जमा करणेत यावेत." असे आवक क्र.४११४ दि.१५/०९/२०२२ अन्वये पत्राने इकडील कार्यालयास कळविलेचे जनमाहिती अधिकारी तथा प्र. उप अभियंता यांनी सांगितले.

## -: आदेश :-

आवक क्र.४११४ दि.१५/०९/२०२२ अन्वये अपीलकर्त्याने दिलेल्या पत्रानुसार अपील कर्त्यास हव्या असलेल्या माहिती बाबत अपिलकर्ता समाधानी असलेचे दिसून येते. सबब सदर अपील निकाली काढणेत येत आहे.

(डॉ.ज्योती धोत्रे)
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाणः १५/०९/२०२२,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-

१. अपिलकर्ता श्री. लहू शिवाजी कांबळे
राहणार :- वैदुवाडी, संगम सोसायटी,जुनी म्हाडा कॉलनी
सुरक्षा नगर रोड, हडपसर पुणे

२. जन माहिती अधिकारी तथा,
प्र.उप अभियंता
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......